# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. ०३/१०/२००३

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा सोमवार दिनांक ०३/१०/२००३ रोजी सभा सुचना क्र. १७ दि. ३०/०९/२००३ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात दुपारी १.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मॉरस रॉड्रीक्स हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

### उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मॉरस रॉड्रीक्स | सभापती |
| २) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| ३) | श्री. कुरेशी याकुब इस्माईल | सदस्य |
| ४) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | सदस्य |
| ५) | श्री. नलावडे दिनेश द. | सदस्य |
| ६) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ७) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| ८) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | सदस्य |
| ९) | श्री. आसिफ गुलाब शेख | सदस्य |
| १०) | श्री. हॅरल बोर्जीस | सदस्य |
| ११) | श्री. अनंत रामचंद्र पाटील | सदस्य |
| १२) | श्रीम. रिटा सुभाष शहा | सदस्या |

### गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मोहन म. पाटील | सदस्य |
| २) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| ३) | श्री. नितीन गो. ठाकूर | सदस्य |
| ४) | श्री. जोजफ जॉन घोन्सालवीस | सदस्य |

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे स्वागत करुन आजच्या सभेच्या कामकाजाला प्र. सचिवांनी सुरुवात करावी.

(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १४१ चे वाचन केले.)

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, आपण इतिवृत्तांताला मंजुरी देत आहोत तर माझी आपल्याला अशी विनंती आहे की, ह्या इतिवृत्तांतामध्ये सभापती साहेबांचे कुठे कुठे रुलिंग आहे की, हे काम सात दिवसांत पूर्ण झाले पाहिजे, असे काही वाक्यांचा उल्लेख असतो, तर ते काम झाले आहेत का? व त्याबाबत निर्णय असा काही होत नाही.

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब मागच्या वेळी असे ठरले होते की, जी रुलिंग देणार तसे काम झाले पाहिजे. जी रुलिंग दिली त्याच्यावर अंमलबजावणी झाली का नाही. त्याचा आपण पुन्हा आढावा घ्यायला पाहिजे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सभापती साहेबांकडून सभागृहात जे आश्वासन दिले जाते त्याची पुर्तता करण्यासाठी संबंधित विभागांनी करावी व सभापती ज्या वेळी रुलिंग देतील त्याची नोंद संबंधित विभागांनी वेळीच घ्यावी.

**मिलन म्हात्रे :-**

केळकर साहेब आपण जे म्हणता ना तर त्याची आपण आमच्या कडून मंजुरी घेतली. हे जर डिफॉल्टी, फॉल्टी जे काय असेल त्याच्यात जर एक आठवड्याचे आश्वासन सभापती साहेब ह्यांनी आम्हांला दिले तर त्याची पुर्तता झाली का नाही त्याचे ते कुठेच नाही. म्हणजे इतिवृत्तांताला मंजुरी घाईघाईमध्ये मिळून जाते. मिटींग संपते, सगळे निघून जातात. प्रशासनाचे काम काय? आमच्याकडून उल्लू बनवून प्रोसिडींगला मंजुरी घेऊन टाकायची. नंतर सभापतींनी बोलावले काय झाले म्हणून तर प्रोसिडींगला मंजुरी मिळाली आणि हात वर. तो प्रकार नाही पाहिजे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

आपल्या ह्या मताशी आम्ही सहमत नाही. प्रशासन कुणाला उल्लू बनवत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मी जे बोलतोय त्याला अधिन राहून मंजुरी देत आहे हे आपण रेकॉर्ड करा.

**प्रकरण क्र. १४१ :-**

दिनांक ०८/०८/२००३ व दिनांक २२/०८/२००३ रोजीचे मा. स्थायी समितीचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. :-**

दि. ०८/०८/२००३ व दि. २२/०८/२००३ रोजीच्या मा. स्थायी समितीच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. मिलन म्हात्रे. अनुमोदन :- श्री. हरेश गावंड**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १४२ चे वाचन केले.)

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा) पुणे मागच्या वेळेला जी कार्यशाळा झाली त्याच्यामध्ये मिरा भाईंदरच्या एकूण दहा नगरसेवकांना आमंत्रित केले होते. त्यानुसार आपल्या महानगरपालिकेतर्फे मी. स्वतः आणि रोहित सुवर्णा असे दोन नगरसेवक गेलो. आम्ही तिथे हजर राहिलो व त्यांनी आम्हांला प्रशस्तीपत्रक दिले. टी.ए.डी.ए. किती आहे त्याचा प्रश्न नाही. त्या मॅडमनी आम्हांला सांगितले तुमचा जो टी.ए.डी.ए. जो काय असेल तो तुम्ही नगरपालिकेकडे पत्र द्या. तुम्हांला ते मिळेल त्यानुसार आम्ही दोघांनी सचिवांकडे पत्रव्यवहार केला पण आम्हांला रक्कम देऊ किंवा नाही देऊ याबद्दल त्यांच्याकडून आम्हांला एका ओळीचे पत्रदेखील आले नाही. हे ह्याच्याकरिता सांगतो जर हे असेच होत राहिले तर एक तर आपल्याकडे असे कोण जात नाही आणि महत्वाची बाब अशी की परवा आम्ही अंधेरी येथे गेला होतो. त्या ठिकाणी तिथल्या मॅडमनी आम्हांला सांगितले की, दर वेळेला आम्ही चर्चासत्र ठेवतो. पण तुमच्या येथून रिस्पॉन्स मिळत नाही. मी ह्या विषयाला धरुनच बोलतोय. सॉलेड वेस्ट मॅनेजमेन्टचे त्यांचे निरनिराळे आहे आणि अंधेरीसारख्या ठिकाणी नगरसेवकांना बोलावले जाते. प्रशासनाकडून एक तर तो कार्यक्रम झाल्यानंतर पत्र मिळतात किंवा पत्र आली तर ती टपालात पडून राहतात. आपण एक सिस्टम अशी का करु नये की, महिन्याच्या एक तारखेला तुम्ही त्यांना विचारा की, ह्या महिन्यात काय कार्यक्रम आयोजित केले आहे. आमच्या येथून नगरसेवकांना पाठवायचे का? आणि पाठवायचे असेल तर तुम्ही नगरसेवकांना पत्र द्यायचे काम करा आणि ज्या कुणाला जायचे असेल ते जातील आणि ज्यांना जायचे नसतील ते नाही जाणार. पण असे अनेक त्यांच्या मिटींग आहेत किंवा वर्कशॉप आहेत त्यापासून आमच्या सारख्यांना वंचित राहावे लागते. प्रशासनाच्या चुकीमुळे आम्हांला जाता

आले नाही. ह्यांची नोंद आपण ह्या विषयामध्ये घ्यावी. यापुढे कुठल्याही ऑल ओव्हर इंडियाच्या इंन्स्टीट्युट कुणाला बोलावतील आणि दिल्लीच्या इन्स्टिट्युटचे काय झाले. त्यांनी कॅन्सल केले त्याचे पुढे काय झाले? आपल्या येथून महिला नगरसेवकांना पाठवायचे का? त्यांना त्यांचे फॉलो अप घेऊन पुढे काय? त्यांनी त्याची दुसरी तारीख परत रेन्युअल केली आहे का? ह्याचा आपण मला खुलासा करावा.

**प्र. सचिव :-**

गणेशोत्सव असल्यामुळे पुढची तारीख देण्यांत यावी असे पत्र त्यांना देण्यांत आले होते. त्याच्यावर अजुनपर्यंत उत्तर आलेले नाही. परंतु आता विचारणा झालेली आहे. आपल्याकडे महिला नगरसेवकांसाठी तीन दिवसांची कार्यशाळा ते लावणार आहेत. फक्त त्यांनी आपल्या येथील महिला नगरसेवकांना विचारुन तारीख कळवायला सांगितले आहे अशी विचारणा एक दोन दिवसांपुर्वीच त्यांनी माझ्याकडे केलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

अंधेरीचे किती वर्कशॉप आमचे बुडाले.

**प्र. सचिव :-**

माझ्याकडे जसे पत्र आले आहे त्याप्रमाणे मी तुमच्यासमोर विषय ठेवलेला आहे.

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधन पुणे या संस्थेने २००३च्या पत्रान्वये रु. २,००,०००/- निधीची मागणी केलेली आहे. शासनाकडे नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक जो दिला आहे दिनांक १३/०६/२००२ चे निर्णयानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेने परस्पर निधी देण्याचे सुचित केले आहे. शासनाने पण ह्या ठिकाणी त्या पत्राद्वारे दोन लाख रुपये अदा करणेंस सुचित केलेले आहे. तर दोन लाख रुपयांसाठी तुम्ही विषय स्थायी समितीसमोर आणता. शासनाने सांगितले आहे तर तुम्ही ते फायनल करुन टाकायला पाहिजे होते, प्रशासनाच्या अखत्यारिमध्ये आणि चंक देऊन अवलोकनार्थसाठी या ठिकाणी आणायला पाहिजे होते. आता तुम्ही दहा लाख रुपयांची खेळणी लावली आणि अवलोकनार्थ आणले आणि दोन लाख रुपयांची बाब आहे असे आपण छोट्या छोट्या गोष्टी स्थायी समितीसमोर आणता ते योग्य वाटते का? या विषयाला मंजुरी देण्यांस माझा विरोध नाही. ह्याच्यात पुढे म्हटले आहे की, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन २००३-०४ च्या अर्थसंकल्पात शाळा, कॉलेज व इतर संस्थांना शैक्षणिक अनुदान देणे या लेखासंहिताखाली रुपये पंचवीस लाखाची तरतुद आहे. तर आपण शाळा आणि कॉलेजला अनुदान दिले आहे का? आणि ते अनुदान देणार आहात का नाही देणार आहात. याबाबत धोरण काय ठरविलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

माझा सांगण्याचा दृष्टीकोन असा आहे, आम्ही लोकल सेल्फ गव्हर्नमेंट, अंधेरी येथे गेल्यानंतर आम्हांला कळले की, अमुक अमुक कार्यक्रम लावले होते आणि तुमच्या नगरपालिकेकडून आम्हांला इंटरेस्ट दाखविला गेला नाही. त्यामुळे ह्या कार्यक्रमाला तुमची उपस्थिती नव्हती. ह्याचा विचार आपण व्यवस्थित करावा. ही नविन महानगरपालिका आहे व चौदा महिने आम्हाला झाले आहेत. व अनेक गोष्टीमध्ये आम्हाला खूप काही शिकायचे असते व आमची इच्छा असते. पण प्रशासनातर्फे आम्हाला कळविले गेले नाही तर आम्हाला तिथे जाता येत नाही. व तिथे जाण्याकरिता प्रशासनाचे पत्र लागते.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सन्मा. सदस्यंना यानंतर कोणत्याही प्रशिक्षणासाठी पत्र आल्यानंतर कळविण्यात येईल. आणि यशदा बाबत मी आपल्याला थोडक्यात माहिती सांगतो. यशदा ही राज्य शासनाची संस्था आहे. परंतू नागरी क्षेत्रामध्ये जी नगरपालिका, महानगरपालिका यांचे कार्य पाहण्यासाठी नागरी क्षेत्रामध्ये अशा त-हेची कोणतीही संस्था शासनाकडे उपलब्ध नव्हती. राज्यशासनाने विनंती केल्यानुसार यशदामध्ये नगरपालिका कर्मचारी, नगरपालिका पदाधिकारी, नगरसेवक ह्या सर्वांनसाठी प्रशिक्षण संस्था असावी कारण की आजच्या काळामध्ये नागरिकरण मोठयाप्रमाणात महाराष्ट्रात होत आहे. आणि त्या दृष्टीने नागरी संस्था असावी यादृष्टीने यशदा येथे नागरी संकुल बांधण्यात येत आहे. त्यात सर्व नगरपालिका आणि महानगरपालिकेने ह्यापूर्वीच अनुदान दिलेले आहे. मी सुद्धा चीफ ऑफीसर असताना एका नगरपालिकेमध्ये अनुदान केव्हाच दिले आहे. त्यात आपल्याला विलंब झालेला आहे. हे दोन लाख रूपये देण्यासाठी स्थायी समितीच्या मंजूरीची आवश्यकता आहे. त्याकरिता हा विषय सभागृहासमोर आणला आहे.

**आसिफ शेख :-**

दोन लाख रूपये देण्याकरिता आमचे दुमत नाही. आपले निश्चित धोरण काय ठरलेले आहे. धोरण ठरले नसेल तर निधी देणे चुकीचे ठरणार आहे. परस्पर आपण देऊन टाका त्याला आमचा विरोध नाही आणि धोरणात्मक निर्णय घ्यायचा असेल तर तो अधिकार मा. महासभेचा आहे. आम्ही मंजूरी देतो आपण हा विषय मा. महासभेसमोर आणा. कायेदशीर कार्यवाही करा ह्यात अडचण निर्माण व्हायला नाही पाहिजे. ह्या स्थायी समितीमध्ये मी ठराव मांडतो की दोन लाखाला मंजूरी दया आणि मा. महासभेसमोर विषय ठेवा. हा धोरणात्मक निर्णय आहे आणि धोरणात्मक निर्णय घेण्याचा अधिकार मा. महासभेला आहे का नाही?

**मिलन म्हात्रे :-**

केळकर सा़े. आम्ही जेव्हा यशदला गेलो हे मी आपल्याला मुद्दामून सांगू इच्छितो की, तिथे इतर ठिकाणचे जवळ जवळ एका वेळेला ८० तें ८५ नगरसेवक आले होते. आणि त्यात पदाधिकारी, स्थायी समितीचे सभापतीही होते. त्या संस्थेमध्ये आलेल्या सर्व सदस्यांची चांगली व्यवस्था ठेवली जाते. दिल्लीला जे महाराष्ट्र सदन आहे तिथे ही एवढी चांगली व्यवस्था नसते. ही जी दोन लाखाची संख्या आहे त्यात कमीत कमी किंवा जास्तीत जास्त हे मला माहित नाही पण जर जास्त रक्कम देता आली तरी त्यात आमची काही हरकत नाही. कारण आपल्याला पाच वर्ष आपली माणसे तिथे पाठवायची आहेत.

**चंद्रकांत वैती :-**

जेवढया महापालिका आहेत त्यांना तेवढे टारगेट दिलेले आहे. मुंबई महानगरपालिकेला पंचवीस लाखाचे टारगेट दिले आहे आणि मिरा भाईंदर महानगरपालिकेला दोन लाखाचे टारगेट दिले आहे.

**मा. सभापती :-**

जे अधिकारी आजच्या सभेला उपस्थित आहेत व आज ज्या ज्या विषयावर चर्चा झाली त्याविषयाची पुर्तता करून आपण मला पुढच्या सभेत आढावा द्यावा. अशी मी आपल्याला नम्र विनंती करतो.

**प्रकरण क्र. १४२ :-**

यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा) पुणे या संस्थेला निधी अदा करणेस मंजूरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. :-**

यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी पुणे या संस्थेने दि. २९/०८/२००३ चे पत्रान्वये रुपये दोन लाख निधी मागणी केली आहे व शासनाकडील नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक जीईएन-१०९६/१००१/प्र.क्र.९८/९६/नवि-२, मंत्रालय, मुंबई, दि. १३/०६/२००२ चे निर्णयानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेने परस्पर संस्थेस निधी देणेबाबत सुचित केले आहे.

यशदा पुणे महाराष्ट्र शासनाचे राज्य विकास प्रशासनात काम करणाऱ्या विविध खात्यातील अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी निर्माण केलेली संस्था आहे. ह्या संस्थामध्ये नागरी प्रशिक्षण संशोधन केंद्राची स्थापना करणे कामी तसेच शैक्षणिक साहित्य अन्य साधन सामुग्रीसाठी मोठ्या प्रमाणात रुपये दोन कोटी निधी लागणार आहे. ह्या निधीस मिरा भाईंदर महानगरपालिकेने रुपये दोन लाखाचे आर्थिक सहाय्य करावे असे दि. १३/०६/२००३ चे शासन निर्णयाप्रमाणे सुचीत केले आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २००३-०४ चे अर्थसंकल्पात अ.क्र.ई. २(अ) शाळा कॉलेज व इतर संस्थांना शैक्षणिक अनुदाने देणे या लेखा शिर्षाखाली (कोड नं. ४६८१) रुपये २५ लाख तरतुद आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६६(२१) नुसार यशदा पुणे या संस्थेस अनुदान देणेची तरतुद आहे. सबब शासन निर्णयानुसार यशदा पुणे या संस्थेस रुपये दोन लाख निधी अदा करणेंस मा. स्थायी समितीची मंजुरी देणेंत येत आहे.

**सुचक :- श्री. आसिफ शेख. अनुमोदन :- श्री. मिलन म्हात्रे**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे आभार मानून आजची सभा येथे संपल्याचे मी जाहिर करत आहे.

**सभा संपल्याची वेळ :- दु. ०१.३० वा.**

**सभापती**
**स्थायी समिती,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगर सचिव,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**